# पहिले विश्व मराठी साहित्य सम्मेलन

माधुरी बापट, थॅचर, ॲरिझोना



बऱ्याच वादग्रस्त परिस्थितीतून वाट काढून व सध्याच्या दोलायमान अशा आर्थिक स्थितीमधूनही यंदाचे म्हणजे २००९ सालातले बरेच गाजलेले पहिले मराठी विश्व सम्मेलन फेब्रुवारी चौदा, पंधरा व सोळा या दिवशी अमेरिकेतील उत्तर कॅलिफोर्नियातील सॅनहोजे या गावातील इंडियन कम्युनिटी सेंटरमध्ये साजरे झाले. आयुष्यात प्रथमच मी मराठी साहित्य सम्मेलनास जायला उत्सुक होते. (विश्व या शब्दाऐवजी जागतिक हा शब्द या ठिकाणी बरोबर वाटला असता. हे माझे वैयक्तिक मत. कारण मंगळावरून वा शुक्रावरून कोणी मराठी माणसे आलेली दिसली नाहीत.) पण महाराष्ट्रातून जवळ जवळ तीनशे लोक आले होते ,असे ऐकले. बे एरियातील मराठी मंडळ, महाराष्ट्रातील साहित्य महामंडळ व पी.एन. जी. सारखे सढळ हाताने देणारे देणगीदार यांच्या जोरावर हे सम्मेलन पार पडले. अपेक्षेपेक्षा चांगल्या दर्जाचे कार्यक्रम झाले. द.मा.मिरासदार, अरुणा ढेरे, सुधीर गाडगीळ, संदीप खरे, नरेन्द्र जाधव, स्वाती दांडेकर अशांबरोबरच बोराडे, ठालेपाटील, पानतवणे ही मंडळीही हजेरी लावून होती. केवळ पुणे, मुंबई मधून साहित्यिक, पत्रकार न येता ते संपूर्ण महाराष्ट्राच्या व महाराष्ट्राच्या बाहेरच्याही कानाकोपऱ्यातून आलेले होते. नागपूर, गुलबर्गा, इंदुर, बेळगाव, जळगाव वगैरे.

शनिवारी सकाळी बरोबर सात वाजता पालखीत ग्रंथ ठेवून त्यासमोर लेझिम वगैरे खेळून ग्रंथ दिंडी काढली होती. झगमग डॉट नेट वर पूर्ण कार्यक्रमाचे प्रक्षेपण चालू होते. उद्घाटनाचा समारंभ सुंदर होता. पूर्ण कार्यक्रमाचे सूत्र सुधीर गाडगीळ व अश्विनी भावे यांनी संभाळले होते. मंगळागौरीचे खेळ, लावणी, जोगवा, गोंधळ यासारखे नाच व गाण्याचे प्रकार पाहून मन हरखून गेले. गोड दिसणाऱ्या व गोड गळ्याच्या मधुवंती भिडेचा कवी सुरेश भटांच्या गाण्याचा कार्यक्रमही सुंदर झाला. त्याला मधुरा गोखलेच्या सुंदर अशा कॉम्पेरिंगची जोड होती. महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या प्रसन्न, हंसतमुख, व रुबाबदार

व्यक्तिमत्वाने पूर्ण कार्यक्रमच हर्षभरित झाला. त्या रात्री हृदयनाथांचा कार्यक्रम मात्र फारच लांबला असे ऐकले.

रविवारी कवीसम्मेलनात अपूर्व असा रानमेवा चाखायला मिळाला. बहुतेक सर्वच कविता वृत्तातल्या नसून मुक्तछंदातल्याच होत्या. महाराष्ट्रातील खेडयापाडयातील लोकांची स्पंदने कवितेतून अनुभवली. कवितेत भाव ओथंबून वहात होते.

नखं कापून दारात टाकू नकोस.<br>
दाणे आहेत असं समजून चिमण्या ती टिपतात,<br>
अन् त्यानेच त्यांची आतडी फाटतात.

अशा आशयाची इंद्रजीत भालेराव यांची कविता माझ्या आजन्म लक्षात रहाणार आहे. तशीच प्रकाश होळकरांची कविताही भावली. द.मा मिरासदारांची भानाचे भूत ही कथा भरपूर करमणूक करून गेली तर वामन होवाळ यांची कथा हृदयाला चाटून गेली.

श्रीनिवास ठाणेदार याची सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली मुलाखत करमणूक करून गेली.

माहय मनगत–बहिणाबाई चौधरींच्या जीवनावर आधारीत –सुमेधा क्षिरसागरचा सुंदर अभिनय.

हसा चकटफू–केदार शिंदे, जाधव, अंकुश चौधरी यांचा अप्रतिम अभिनय व निर्भेळ करमणूक. केदार शिंदे हा शाहीर साबळे यांचा नातू. त्यांच्या इतकेच सुंदरपणे ते एकनाथी भारुडे म्हणतात.

सिंधुताई सपकाळ : अनाथ मुलांसाठी आश्रम चालवणाऱ्या, सुंदर वक्तव्य करणाऱ्या म्हणून चांगल्या लक्षांत रहातील.

सोमवारी अरुणा ढेरे यांच्यासमवेत मी माझा फोटो काढून घेतला. त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने मी खूष. संतवाडमय व विज्ञान हा एक परिसंवाद ऐकून मी फिनिक्स कडे परत. परिसंवादात प्रा. मिलिंद जोशी यांना प्रा. राम शेवाळकर यांनी सांगितलेला, दारूच्या गुत्त्याकडे माणसं आपणहून जातात, दुधाचा रतीब मात्र घरोघरी जाऊनच घालावा लागतो, हा मंत्र मनात रुंजी घालत राहिला. उद्घोष ही सम्मेलनाची स्मरणिका आकर्षक आहे.

नेहमीप्रमाणे पंजाबी जेवण पाहून मी नाराज पण इतरांना ते आवडते, तेव्हा मी निमूटपणे खाल्ले. सर्वच कार्यक्रम हे एक दोन तास उशिरा म्हणजे वेळेतच सुरू झाले. अमेरिकेत आम्ही कामावर वेळेवर न चुकता जातो. अशा प्रसंगी वेळेचं अवधान बाळगायलाच पाहिजे असं नाही, या मताची मी आहे. इथं मन मोकळं करायला यायच, चार मित्र मैत्रिंणीना भेटायला यायच, तेव्हा वेळेच्या बंधनाची टांगती तलवार कशाला डोक्यावर बाळगायची?

अमेरिकेत तीस वर्षे राहिल्याने नव्या दमाच्या मराठी लेखक, कवीची माझी ओळख नव्हती. ती या सम्मेलनामुळे झाली.कितीतरी मराठी लेखक,कवी हे आपणहून अमेरिकेत कधी आलेच नसते. त्यांना ही सुवर्णसंधी मिळाली. दर एक वर्षाआड होणाऱ्या,पण अधिकाधिक व्यापारी होत चाललेल्या, बी. एम. एम. च्या अधिवेशनात साहित्य या विषयाला वाव नसतो. म्हणून अशाप्रकारचे मराठी साहित्य सम्मेलन दरवर्षी लहान प्रमाणावर का होईना पण अमेरिकेत व्हायला हवे असे वाटले.